# बालसाहित्य - संशोधनासाठी नवदिशा

**प्रा. ए. बी. भावसार**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग
डॉ. मनोरमा व प्रा. ह. शं. पुंडकर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बाळापूर
bhavsaralhad@gmail.com

*मराठी साहित्याच्या दीर्घ परंपरेतील नव्वोदोत्तर कालखंड हा अनेक दृष्टीने महत्त्वाचा आहे. कथा, कविता, कादंबरी, नाटक यासारख्या विविध वाङमय प्रकारात नाविन्यपूर्ण निर्मितीचा हा कालखंड मराठी साहित्यातील एक मैलाचा दगड मानला जातो. या नव्वोदोत्तर कालखंडात निर्माण झालेल्या साहित्याचा विविध अंगांनी अभ्यास करण्याची परंपरा अस्तित्वात यायला सुरुवात झाली आहे. बालसाहित्य ही याला अपवाद नाही. नव्वदोत्तरी कालखंडात समकालीन बालकांचा सर्वांगीण विचार करत, त्या दृष्टीने होणारी विविध वाङ्मय प्रकारातील बालसाहित्य निर्मिती त्यादृष्टीने समकालीनता हे नव्वदोत्तरी बालसाहित्याचे ठळक वैशिष्ट्य आहे. नव्वदोत्तरी कालखंडातील बालकथा, बालकविता, बालनाट्य, बालकादंबरी, माहितीपर विज्ञाननिष्ठ आणि लालित्यपूर्ण बालसाहित्य अशा विविध प्रकारच्या वाङमय प्रकारात संशोधन करायला भरपूर प्रमाणात वाव आहे.*

*बीज शब्द - बालसाहित्य, बालसाहित्य परंपरा, बालसाहित्य संशोधनक्षेत्र*

**प्रस्तावना :-**

लिखित मराठी भाषेला सुमारे आठशे वर्षांची परंपरा लाभलेली आहे. त्याआधी मराठी साहित्यात मौखिक साहित्याची एक समृद्ध परंपरा अस्तित्वात होती. ही परंपरा समृद्ध करण्यात विविध प्रकारच्या साहित्यिकांचे मोलाचे योगदान आहे. काळाच्या ओघात कथा, कविता, कादंबरी,नाटक, ललित गद्य, समीक्षा यासारखे विविध प्रकारचे वाङमय प्रकार निर्माण झाले. आणि या वाङ्मय प्रकारांच्या समर्थ परंपरेने भारतीय साहित्य संस्कृतीत मराठी साहित्यविश्वाची वैशिष्ट्यपूर्ण ओळख निर्माण केली. मराठी बालसाहित्यही याला अपवाद नव्हते.

बालसाहित्य हा मराठी साहित्यातील महत्त्वाचा वाङ्मय प्रकार आहे. बालसाहित्य या संज्ञेतच बालसाहित्य या वाङ्मय प्रकाराचा चेहरामोहरा स्पष्ट होतो. “बालकांचे मनोरंजन करत, तसेच त्यांच्यावर संस्कार करण्याच्या उद्देशाने जाणीवपूर्वक निर्माण होणारे साहित्य म्हणजे बालसाहित्य होय.” बालसाहित्यासंदर्भात अभ्यासकांनी बालसाहित्याचा अभ्यास करून विविध प्रकारच्या व्याख्या सांगितल्या आहेत. या व्याख्यांचे अवलोकनातून बालसाहित्याचे स्वरूप स्पष्ट होते.

**बालसाहित्याचे स्वरूप -**

आशयानुसार केलेली बालसाहित्य ही संज्ञा वर्णनपर आहे. बालसाहित्य हे प्रामुख्याने बालकांसाठी जाणीवपूर्वक निर्मिलेले असते.

बालसाहित्य आणि बालमानसशास्त्र यांचा घनिष्ठ संबंध असतो. बालवाचकांचे शिशूगट, किशोरवयीनगट आणि कुमारवयीन गट मानले जातात. हे गट बालवाचकांच्या वयोगटाशी संबंधित असतात. बालसाहित्य निर्मिताना बालसाहित्यिकाला बालवाचकांच्या वयोगटाचा आणि संबंधित वयोगटाच्या मानसिकतेचा सजग विचार करावा लागतो.

बालकांची वाढ होताना बालकांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि भावनिक तसेच सामाजिक विकास होत असतो. बालसाहित्यिकाला बालसाहित्य निर्मिताना बालकांच्या या वाढ आणि विकास प्रक्रियेचे भान असणे आवश्यक असते. यामुळे बालवाचकांना बालसाहित्याशी जोडून घेणे सोपे आणि सहज होते. याद्दष्टीने पाहता बालसाहित्याचे विषय हे बालकांच्या भावविश्वाशी संबंधित असले पाहिजे. बालसाहित्याचा विषय, आशय हा बालकांच्या भावविश्वाशी संबंधित असल्याने याचा प्रभाव

बालसाहित्याच्या संरचनेवर पडताना दिसून येतो. बालसाहित्याचा आशय गद्यप्रधान असल्यास संबंधित बालसाहित्याचा आकृतिबंध, त्याचा आशय, आशयाशी, कथानकाशी संबंधित घटनाप्रसंग, त्यांची आटोपशीर, प्रभावी व कलात्मक गुंफण, संबंधित बालसाहित्याची भाषा, वातावरण याबाबत बालसाहित्यिकाने सजग असणे आवश्यक असते. ताल, ठेका, लयबद्धता, नाद आणि पुनरुक्ती हे पद्यप्रधान बालसाहित्याचे महत्त्वाचे अंग आहे. पूर्व शिशुगटातील बालकांसाठी बडबडगीते आणि तालगीते निर्मिली जातात. पुढे साध्या सोप्या बालगीतांनी बालकांचे मनोरंजन केले जाते. रंग, रुप, स्पर्श, गंध, चव, नाद यांचा प्रत्यय आणून देणारी बालगीते, बालकविता वैशिष्ट्यपूर्ण ठरतात. बालसाहित्यात कल्पनाशक्ती आणि अद्भुतरम्यता महत्त्वाची भूमिका बजावतात. बालसाहित्यातून बालकांचे मनोरंजन करताना भोवतालच्या विश्वाबद्दलची जिज्ञासापूर्ती होणे गरजेचे असते. भोवतालच्या विश्वाबद्दल बालक सजग असतो. भोवतालच्या विश्वातील प्रत्येक सजीव निर्जीव घटक बालसाहित्यात स्वतःचे रंग, रुप, आकार, भाषा घेऊन प्रकटताना दिसतो.

मराठी साहित्य परंपरेत अलिकडे बालसाहित्याने एक वाङ्मय प्रकार म्हणून मानाचे स्थान मिळवले आहे. मौखिक वाङ्मय परंपरेतून विकसित होत गेलेल्या बालसाहित्याला लिखित वाङ्मयची सशक्त परंपरा लाभली आहे. १८०६ साली तंजावरच्या सरफोजीराजे भोसले यांनी सखब्न पंडित यांचे कडून इसापनीतीचे मराठी भाषांतर करवून घेतले. आणि या “बालबोध मुक्तावली“ पुस्तकापासून लिखित मराठी बालसाहित्याची सुरवात झाली. मुद्रण कलेच्या आगमनानंतरचा हा काळ ‘भाषांतर युग’ म्हणून ओळखला जातो. या काळात शालेय पुस्तक निर्मिती करण्याच्या दृष्टीने विविध प्रकारच्या संस्कार प्रधान बालसाहित्याची भाषांतरे झाली. सोबत मराठी व्यतिरिक्त इतर प्रांतातील, देशातील, भाषेतील साहित्यावर आधारित बालसाहित्य निर्मिती होऊ लागली. पुढे स्वतंत्र बालसाहित्य निर्मितीस प्रारंभ झाला. आणि नव्या उत्साहाने, नव्या दृष्टीने विविध वाङ्मय प्रकारात बालसाहित्य लेखन सुरू झाले. मराठी भाषेत आजमितीस बालसाहित्याने स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण साहित्य प्रकार म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. स्वातंत्र्योत्तर काळापासून विपुल प्रमाणात बालसाहित्य निर्मिती सुरू आहे. विविध वाङ्मय प्रकारासोबत बालमासिके, विविध वर्तमानपत्रात नियमित प्रसिद्ध होणारा बालकांसाठीचा मजकूर बालकांचे मनोरंजन करत, बालकांवर संस्कार करत आपली भूमिका चोखपणे बजावत आला आहे. संख्येने विपुल प्रमाणात होणाऱ्या बालसाहित्याची समीक्षा होणे आवश्यक ठरते. समीक्षा व्यवहारातून बालसाहित्याला, बालसाहित्यिकांना योग्य मार्गदर्शन मिळू शकते. आणि या मार्गदर्शनातून मराठी बालसाहित्याच्या योग्य विकास होण्यास हातभार लागू शकतो.

बालसाहित्य समीक्षा - “इंग्रजी साहित्य व्यवहारातील Criticism या संज्ञेसाठी मराठी भाषा व साहित्य व्यवहारात समीक्षा या पर्यायी शब्दाचा वापर केला जातो. ‘सम +ईक्ष’ या मूळ घटक शब्दांनी तयार झालेल्या समीक्षा या शब्दाचा अर्थ आहे कसोशीने परीक्षण करणे, चाळणी लावणे, चिकित्सा करणे असा होतो. साहित्य व कला व्यवहारात उपरोक्त विशिष्ट अर्थाने या संज्ञेचा वापर केला जातो. व्यक्तिनिष्ठ संस्कारनिष्ठ आवडनिवड व्यक्त करणाऱ्या शेरेबाजीपलीकडे जात समीक्षेला तत्त्वे, नियम यांच्यावर आधारित विधाने करावी लागतात. बौद्धिक प्रक्रियेतून ही विधाने अस्तित्वात येत असतात.” - (करोगल डॉ. सुषमा. (२०२२) समीक्षा: सैद्धांतिक व उपयोजित. य. च. म. मु. नाशिक)

बालसाहित्याचे अनेक प्रकारे समीक्षण करता येते. एखाद्या बालसाहित्याच्या कोणत्याही वाङ्मय प्रकारातील एखाद्या विशिष्ट कलाकृतीचे समीक्षण असो किंवा एखाद्या विशिष्ट बालसाहित्यिकाने निर्मिलेल्या सर्व बालसाहित्यकृतींचे असो, समीक्षण करता येते. यावरून बालसाहित्य कलाकृतीकेंद्रित समीक्षा, बालसाहित्यिककेंद्रित समीक्षा असे प्रकार पडतात. संबंधित बालसाहित्यकृतीचा किंवा बालसाहित्यिकाच्या समग्र अभ्यासातून संबंधित बालसाहित्यकृतीचे किंवा बालसाहित्यिकाचे योग्य मूल्यमापन करणे शक्य होते. या प्रकारे समीक्षा करताना आकलन, विश्लेषण, तुलना, अर्थनिर्णयन, मूल्यमापन यासारख्या क्रिया घडून येतात. बालसाहित्य आणि बालसाहित्यिक हे आपापल्या सांस्कृतिक, सामाजिक पर्यावरणाला बांधलेले असतात. या परिप्रेक्ष्यात बालसाहित्यकृतीचे आणि बालसाहित्यिकाचे मूल्यमापन करणे आवश्यक ठरते. समीक्षा

करताना बालसाहित्यकृतीशी संबंधित काळाचा विचार करणे महत्त्वाचे असते. प्रत्येक बालसाहित्यकृती ही संबंधित काळाचे अपत्य असते. कमी अधिक फरकाने बालसाहित्यकृतीतून बालसाहित्यकृतीशी संबंधित काळाचे वाचन करता येते. बालसाहित्यकृतीतून व्यक्त होणारा आणि बालसाहित्यकृतीशी संबंधित असणारा काळ हा भिन्न भिन्न असतो. उदाहरणादाखल अव्वल इंग्रजी कालखंडात पुस्तक छपाई सुरू झाल्यानंतर सुरवातीला स्वतंत्र विचाराने लिहिल्या गेलेल्या पुस्तकांची संख्या अत्यंत कमी होती. मात्र त्याकाळात विविध प्रकारची पुस्तके मराठीत भाषांतरित होण्याचे प्रमाण जास्त होते. मराठी वाङ्मय इतिहासात हा काळच मुळी 'भाषांतर युग' म्हणून ओळखला जातो. या कालखंडात निर्माण झालेले बहुतांश बालसाहित्य हे भाषांतरित आहे. या भाषांतरित बालसाहित्याने आणि प्रचलित लोकसाहित्याने कळत नकळत मराठी बालसाहित्याचा पाया रचला. तत्कालीन ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय परिस्थितीच्या संदर्भात या भाषांतर युगाचे आणि भाषांतरित बालसाहित्याचे विश्लेषण करावे लागते. भाषांतराच्या दृष्टीने, रुपांतराच्या दृष्टीने तत्कालीन बालसाहित्याचा अभ्यास करणे हे नाविन्यपूर्ण बालसाहित्य संशोधनाची दिशा स्पष्ट करते. कोणताही साहित्य व्यवहार हा व्यापक सामाजिक-सांस्कृतिकतेचा अन्योन्य भाग असतो याचे भान राखून बालसाहित्यकृतीचा, तिच्याशी संबंधित काळाचा, वास्तवाचा, बालसाहित्यकृतीतील पात्रांचा, त्यांच्या कृतिउक्तींचा, मानसिकतेचा अभ्यास करणे हे बालसाहित्य संशोधनासाठी दिशादर्शक ठरते. तसेच यादृष्टीने बालसाहित्याच्या इतिहासाची मांडणी करता येऊ शकते. सुरवातीच्या या कालखंडातील बालसाहित्य हे उपदेशपर होते. “कृ. वि. करंदीकर (१८९४) लिखित शहाणपणाचा ओनामा, केवड्याचे कणीस, पिंपळावरचा मुंजा यातून अनुक्रमे मुलांनी कसे वागावे, अंधश्रद्धेववर आघात असे विषय हाताळले आहेत. त्रिं. वि. पित्रे (१८९६) यांनी मुलामुलींस खाऊ, साळुंकी फुले ही बालकांसाठी उपदेशपर पुस्तके लिहिली आहेत. दुसरीकडे नरसो गणेश वाडदेकर यांनी लिहिलेल्या चुलीपुढील शास्त्रीय गोष्टी, व्यवहारातील शास्त्रीय गोष्टी, सुगम पदार्थविज्ञान या पुस्तकांतून बालकांना विज्ञानविषयक माहिती दिली आहे. आई सैंपाक करत असताना लेक तिला प्रश्न विचारतो आहे की, लाकूड का जळते? हवा का जळत नाही? वगैरे प्रश्नांची उत्तरे आई देताना दिसते. व्यवहारातील शास्त्रीय गोष्टी या पुस्तकात चुनखडी, अत्तर, साधा कागद, टिपकागद, कात, डाळिंबाचा रंग, जळणे, गंजणे इ. १५ ते २० पदार्थांची आणि वस्तूंची वर्णने, कार्यकारणभाव, उपयोग, दुरुपयोग या सर्वांचे उत्तम विवेचन आहे.” (भागवत, लीलावती. (१९९५).'मराठी बालसाहित्य प्रवाह आणि स्वरूप', नवीन उद्योग, पुणे)

विशिष्ट काळात विविध प्रकारचे साहित्य निर्माण होत असते. काळाच्या संदर्भात या साहित्याची सुसंगत मांडणी करुन बालसाहित्याचा इतिहास मांडता येतो. दुसरीकडे बालसाहित्यकृतीचा आशय आणि अविष्कारासंदर्भात समीक्षा करता येते. मराठी बालसाहित्य परंपरेत संबंधित बालसाहित्यिक तसेच त्याच्या बालसाहित्याचे नेमके स्थान शोधता येते. या प्रकारच्या सर्व समीक्षा व्यवहाराचा समावेश बालसाहित्याच्या उपयोजित समीक्षा पद्धतीत होतो. वाचकांच्या अभिरुचीला वळण देण्याचे महत्त्वपूर्ण काम या उपयोजित बालसाहित्य समीक्षेद्वारे साधले जाते. मराठी साहित्य व्यवहारात उपयोजित बालसाहित्य समीक्षेच्या तुलनेत बालसाहित्याची सैद्धांतिक समीक्षा करणारे लेखन तसे कमी आहे. बालसाहित्याच्या संदर्भात झालेली सैद्धांतिक समीक्षा ही प्रचलित सैद्धांतिक समीक्षेवर आधारित आहे. बालसाहित्य हे बालकांसाठी, प्रौढ साहित्य हे प्रौढांसाठी या भेदाव्यतिरिक्त मूळ साहित्य प्रकार त्याची वैशिष्ट्ये ही सारखीच आहे. उदाहरणार्थ कथा या वाङ्मय प्रकारात कथानक, व्यक्तिरेखा, मोजके घटना-प्रसंग, संघर्ष, भाषाशैली, वातावरण इ. घटकांचा समावेश होतो. कथेचा हा नियम बालकथेलाही लागू आहे. बालकथेतही कथानक, व्यक्तिरेखा, मोजके घटना-प्रसंग, संघर्ष, भाषाशैली, वातावरण इ. घटकांचा समावेश होतो. या कारणास्तव मराठी भाषेत बालसाहित्यविषयक सैद्धांतिक समीक्षेचे प्रमाण कमी आहे. अलिकडच्या काळात बालसाहित्यविषयक उपयोजित समीक्षा लेखनाचे प्रमाण वाढले आहे. बालसाहित्याबाबत निर्माण झालेली सजगता, विपुल प्रमाणात निर्माण होणारे बालसाहित्य, विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात बालसाहित्याला मिळालेले स्थान, विविध वृत्तपत्र, नियतकालिकांतून बालसाहित्याला मिळणारी प्रसिद्धी यासारख्या कारणांमुळे बालसाहित्यविषयक उपयोजित समीक्षा लेखन होण्याचे प्रमाण वाढते आहे. बालसाहित्यकेंद्री, बालसाहित्यिककेंद्री दृष्टीने बालसाहित्य समीक्षा क्षेत्रात नवीन

संशोधन भरपूर वाव आहे. साहित्य समीक्षेतील नव्या संकल्पनांचे उपयोजन बालसाहित्य समीक्षा व्यवहारात करणे हे बालसाहित्य समीक्षा नवीन दिशा देणारे आहे. बालकथा, बालकादंबरी,बालकविता, बालनाट्य, बालकांसाठी केले जाणारे वैज्ञानिक,माहितीपर लेखन इत्यादी बालसाहित्य वाङ्मय प्रकाराशी संबंधित बालसाहित्य संशोधनाचा विस्तृत अवकाश संशोधनासाठी उपलब्ध आहे. सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक दृष्टिकोनातून बालसाहित्याची समीक्षा करता येणे शक्य आहे. कालखंडाच्या अनुषंगाने अर्वाचीन काळातील, स्वातंत्र्योत्तर काळातील, आधुनिक काळातील बालसाहित्य या दृष्टीकोनातूनही बालसाहित्य संशोधन करता येते. या प्रचलित संशोधना क्षेत्रासोबत बालसाहित्याचा तौलनिक अभ्यास ही बालसाहित्य संशोधनाची दिशा स्पष्ट करतो.

**निष्कर्ष :**

- मराठी बालसाहित्याला समृद्ध परंपरा लाभली आहे.
- मराठी बालसाहित्य निर्मितीचे प्रमाण वाढते आहे.
- बालसाहित्य व्यवहारात सजगता निर्माण झाली आहे.
- समग्रलक्षी बालसाहित्य समीक्षेला भरपूर वाव आहे.
- प्रचलित सैद्धांतिक व उपयोजित समीक्षादृष्टीने बालसाहित्य समीक्षा संशोधनासाठी दिशादर्शक आहे.

**संदर्भ :**

1. करोगल डॉ. सुषमा. (२०२२) समीक्षा: सैद्धांतिक व उपयोजित. य. च. म. मु. नाशिक
2. भागवत, लीलावती. (१९९५) .'मराठी बालसाहित्य प्रवाह आणि स्वरूप', नवीन उद्योग, पुणे